खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३–२४

## डॉ. दिलीप मुळूक यांना पुरस्कार

### डॉ. दिलीप मुळूक यांना यंग टिचर पुरस्कार

राजगुरुनगर, (वार्ताहर) : महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषदेचा या वर्षीचा मानाचा आदर्श शिक्षक पुरस्कार (यंग टीचर अवार्ड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिलीप मुळूक यांना प्राप्त झाला. महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद व पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लोणी प्रवरानगर येथे आयोजित ४० व्या आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेत डॉ. दिलीप मुळूक यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

लोकमत




हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. दिलीप मुळूक यांना शिक्षक पुरस्कार देण्यात आला.

# मुळूक यांना यंग टिचर अवॉर्ड

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषदेचा या वर्षीचा मानाचा आदर्श शिक्षक पुरस्कार (यंग टीचर अवार्ड), हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. दिलीप मुळूक यांना प्राप्त झाला. महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद व पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लोणी प्रवरानगर येथे आयोजित ४० व्या आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेत डॉ. दिलीप मुळूक यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र श्रीलंकेतील केलेनिया विद्यापीठाचे डॉ. अमरसिंगे आणि मभूपचे अध्यक्ष डॉ. प्रविण सप्तर्षी यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी मभूपचे कार्याध्यक्ष प्रा. बाळासाहेब गोफणे, उपाध्यक्ष आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. अर्जुन मुसमाडे, सचिव डॉ. ज्योतीराम मोरे, मभूपच्या कार्यकारिणीचे सर्व सदस्य आणि प्राध्यापक उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल डॉ. दिलीप मुळूक यांचे अभिनंदन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी केले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Jan 21, 2024
Powered by: erelego.com





# डॉ. दिलीप मुळूक यांना यंग टिचर अवार्ड प्रदान

**राजगुरूनगर :** महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषदेचा या वर्षीचा मानाचा आदर्श शिक्षक पुरस्कार (यंग टीचर अवार्ड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. दिलीप मुळूक यांना प्राप्त झाला. महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद व पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लोणी प्रवरानगर (ता. राहता, जिल्हा अहमदनगर) येथे आयोजित ४० व्या आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेत डॉ. दिलीप मुळूक यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र श्रीलंकेतील केलेनिया विद्यापीठाचे डॉ. अमरसिंगे आणि मभूपचे अध्यक्ष डॉ. प्रविण सप्तर्षी यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी मभूपचे कार्याध्यक्ष प्रा. बाळासाहेब गोफणे, उपाध्यक्ष तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. अर्जुन मुसमाडे, सचिव डॉ. ज्योतीराम मोरे, मभूपच्या कार्यकारणीचे सर्व सदस्य, आणि प्राध्यापक उपस्थित होते. महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषदेकडून दरवर्षी डॉ. प्रवीण सप्तर्षी आदर्श शिक्षक पुरस्कार (यंग टीचर अवार्ड) ४५ पेक्षा कमी वयाच्या अध्यापक संशोधकाला दिला जातो. डॉ. दिलीप मुळूक यांची शैक्षणिक पात्रता, संशोधन, ग्रंथलेखन, संशोधन प्रकल्प, चर्चासत्रातील सहभाग, पेटंट व इतर सर्जनशील उपक्रम आणि महाविद्यालय पातळीवर करत असलेले विविध प्रकारचे कामकाज यांचे साकल्याने परीक्षण करून पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. या पुरस्काराबद्दल डॉ. दिलीप मुळूक यांचे अभिनंदन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभागप्रमुख